अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०६/०८/२०२५

**—: प्रेसनोट :—**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | २६/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८, कलम २३८ भारतीय न्याय संहिता २०२३. |
| अटक आरोपी लोकसेवक | श्रीमती जयश्री सुभाष लोंढे, पोलीस उप निरीक्षक, विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई |
| पाहिजे आरोपी | श्री. जयप्रकाश माळी, पो.ह.क्र. ०५२६६, विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ३५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रु. २५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार व त्यांचे मित्र यांचेविरोधात विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल आहे. नमूद गुन्हयातील तपासी अधिकारी श्रीमती जयश्री सुभाष लोंढे, पोलीस उप निरीक्षक यांनी दिनांक ०३/०८/२०२५ रोजी तक्रारदार व त्यांचे मित्र यांना पोलीस ठाणे बोलाविले होते. त्यानुसार तक्रारदार, त्यांचे मित्र व तक्रारदार यांचे नातेवाईक हे पोलीस ठाणेस गेले असता, लोकसेवक पोउनि लोंढे यांनी तक्रारदार व त्यांचे मित्र यांना नमूद गुन्हयात मदत करणेकामी व दुसऱ्या गुन्हयात न अडकविण्यासाठी रू. १,००,०००/- लाचेची मागणी केली व त्यांचे मोबाईल जप्त केले. तक्रारदार यांनी ते मजूर असून त्यांचेकडे एवढे पैसे नसल्याचे सांगितल्याने पोउनि लोंढे यांनी तक्रारदार यांच्याकडे रू. ५०,०००/- लाचेची मागणी करून यातील काहीही कमी होणार नाही असे सांगून पैसे नाही दिले तर जैल मध्ये टाकून देणार असे सांगितले. नमूदवेळी तक्रारदार यांचे नातेवाईक यांनी पोउनि लोंढे यांना रू. १५,०००/- दिले असता, पोउनि लोंढे यांनी तक्रारदार व त्यांचे मित्रांना सोडून दिले व उर्वरीत ३५,०००/- लाचेची रक्कम दिल्यानंतरच मोबाईल परत करणार असे सांगितले. त्यानंतर दिनांक ०४/०८/२०२५ रोजी पोउनि लोंढे यांनी पुन्हा तक्रारदार यांचे नातेवाईक यांना मोबाईल पाहिजे असल्यास व गुन्हयात मदत करायची असेल तर उर्वरीत रू.३५,०००/- लाच आणून देण्यास सांगितले. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०५/०८/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०८/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक जयश्री सुभाष लोंढे, पोलीस उप निरीक्षक यांनी तक्रारदार यांचे नातेवाईक यांच्याकडे रू. ३५,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. २५,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान इतर लोकसेवक जयप्रकाश माळी, पो.ह.०५२६६ यांनी तक्रारदार यांचे नातेवाईक यांना स्वत:च्या गाडी बसवून घेऊन गेले व तक्रारदार यांचे नातेवाईक यांचेकडून लाचेची रक्कम रू. २५,०००/- स्विकारली परंतू लोकसेवक जयप्रकाश माळी यांना संशय आल्याने ते लाचेच्या रक्कमेसह गाडीतून पळून गेले. त्यामुळे लोकसेवक श्रीमती जयश्री सुभाष लोंढे, पोलीस उप निरीक्षक, विनोबा भावे नगर पोलीस ठाणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ व भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २३८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती उज्वला भडकमकर, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री चंद्रकांत माळी, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अनिल तुकाराम घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त,(१)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net